महाराष्ट्र शासन

क्रमांक- व्हीएलएस-१०८३/सीआर-२६०४)
प्राशि-३
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ९।९।८६

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय:- १९८६-८७ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन ज्ञानार्जन शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, उद्योगनगर-चिंचवड, पुणे-३३ या संस्थेस उद्योगनगर चिंचवड जिल्हा पुणे याठिकाणी जून, १९८६ पासून इ. १ ते ४थी च्या वर्गासहित मराठी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास नेहमीच्या विहित अटींवर तसेच विशेष करुन खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर खास बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२) संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४) संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

करण्यात यावी :-

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधि× अधिनियमाखाली नोंदली आहे.

२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाही अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

४. तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर प्राथमिक शाळेला प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक-30 सप्टेंबर, १९८८ पर्यंत पूर्ण करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास दिनांक- ७ ऑक्टोबर, १९८८ पर्यंत कळविण्यात यावा.

( वृं. श्री. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) प्रशासन अधिकारी, महानगर पालिका, शिक्षण मंडळ, पुणे

४) मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

५) शिक्षण मंत्र्यांचे खाजगी सचिव

६) शिक्षण राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

७) निवड फाईल.

सत्यप्रत

पोकळे- २८८८८

कक्ष अधिकारी
महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई ४०० ०३२